॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon



जा.क्र. कबचौउमवि/७-क/ शिक्षणशास्त्र/३३०७/२०२६ दिनांक : १४/११/२०२६

प्रति,
मा. प्राचार्य/प्राचार्या,
कबचौउमविशी संलग्न सर्व शिक्षणशास्त्र व शारिरीक शिक्षणशास्त्र महाविद्यालये.

विषय :- आंतरविद्या शाखीय विद्याशाखे अंतर्गत बी.एड, बी.पी.एड, एम.एड व एम.पी.एड अभ्यासक्रमाच्या अंतर्गत मूल्यमापन परिशीलन आणि पर्यवेक्षण समितीने केलेल्या शिफारसीबाबत.

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, कबचौउमवि, जळगाव कार्यालयाने जळगाव, धुळे आणि नंदुरबार या तिन्ही जिल्हयातील सर्व शिक्षणशास्त्र व शारिरीक शिक्षणशास्त्र महाविद्यालयांची एप्रिल २०२६ मध्ये अंतर्गत प्रात्यक्षिक आणि मूल्यमापन परिशीलन आणि पर्यवेक्षणासाठी प्रात्यक्षिक कार्य समिती मार्फत तपासून घेतले असता प्राप्त अहवाल ठराव क्र. प.मू.मं. २८/२०२६, दि. १६/१०/२०२६ रोजीच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळा समोर सादर केला असता खालील प्रमाणे ठराव पारीत करण्यात आला आहे.

(२) परिशीलन आणि पर्यवेक्षण समितीने केलेल्या शिफारशी स्विकारण्यात याव्यात, व शिफारशीनुसार कार्यवाही करण्यात यावी, असे सर्वानुमते ठरले.

प्राप्त ठरावातील शिफारशी अन्वये आपल्या महाविद्यालयातील ...

१. एन.सी.टी.ई. नवी दिल्ली, महाराष्ट्र शासन आणि कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव यांच्या निर्देशानुसार नियमित प्राचार्य शिक्षक यांची नियुक्ती करून विद्यापीठाद्वारे दरवर्षी स्टाफ प्रोफाइल प्रमाणित करून एन.सी.टी.ई. नवी दिल्ली, महाराष्ट्र शासन आणि कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव यांचेकडे सादर करणे अनिवार्य करण्यात यावे.

२. सर्व शिक्षणशास्त्र व शारिरीक शिक्षणशास्त्र महाविद्यालयांनी एन.सी.टी.ई. नवी दिल्ली, आणि कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगावच्या निर्देशानुसारच अभ्यासक्रमाची अध्ययन अध्यापन आणि मूल्यामापनाची काटेकोर अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. त्याच्या कार्यवाहीची पडताळणी विद्यापीठाद्वारे वेळोवेळी करण्यात यावी.

३. एन.सी.टी.ई. नवी दिल्लीच्या निर्देशानुसार सराव पाठशाळा आणि आंतरवासितासाठी निवड केलेल्या शाळा या शासनमान्य आणि किमान पाच वर्षापेक्षा जास्त कालावधी असलेल्या माध्यमिक शाळांची निवड करण्यात यावी. त्यासाठी संबंधित शाळा तसेच संबंधित शिक्षणाधिकारी/ गटशिक्षणाधिकारी यांच्या परवानगी घेवून ती शाळांची यादी विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यामापन विभागाकडे पाठवण्यात यावी.

४. एन.सी.टी.ई. नवी दिल्ली यांच्या नियमानुसार शिक्षक आणि विद्यार्थी यांची बायोमेट्रिक उपस्थिती घेण्यात येवून दरमहा हजेरी अहवालाचे जतन करण्यात यावे. सदर अहवाल परिशिलन समितीसमोर सादर करण्यात यावा.

५. बी.एड, एम.एड, बी.पी.एड आणि एम.पी.एड हे पूर्णवेळ व्यावसायिक अभ्यासक्रम आहेत त्यामुळे पुर्णवेळ/अर्धवेळ/सरकारी/खाजगी/तत्सम नोकरीत असलेल्या विद्यार्थांना महाविद्यालयांनी प्रवेश देवू नयेत. तसे हमीपत्र संबंधित विद्यार्थी यांच्याकडून भरून घेण्यात यावे आणि मा. प्राचार्य यांनी पात्रता यादी सादर करतांना अशा कोणत्याही विद्यार्थ्याला प्रवेश दिलेला नाही असे हमीपत्र दयावे.

६. अंतर्गत प्रात्यक्षिक कार्य आणि कॉलेज असेसमेंट यांचे वस्तुनिष्ठ आणि विद्यापीठाच्या निर्देशानुसारच मूल्यमापन करण्यात यावे. जर एखादया महाविद्यालयाने प्रात्यक्षिक कार्य आणि कॉलेज असेसमेंट मध्ये नकळत सदोष मूल्यामापन केले तर अशा महाविद्यालयावर दंडात्मक कार्यवाही करण्यात यावी.

७. ज्या महाविद्यालयांनी अनुपस्थित विद्यार्थ्यांना गुणदान केलेले आहे. अशा महाविद्यालयांनावर कठोर कार्यवाही परीक्षा व मूल्यमापन मंडळाने करावी.

तरी आपण मा.परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या ठराव व प्राप्त शिफारशी सर्व संबंधित घटकांच्या निर्देशनास आणून देवून त्यांचे काटेकोरपणे पालन करावे, ही विनंती.

म. कळावे,

आपला विश्वासू,

संचालक,
परीक्षा व मूल्यमापन मंडळ